# महिलेची पर्स परत करून माहूर पोलिसांनी घडविले माणुसकीचे दर्शन



श्रीक्षेत्र माहूर (प्रतिनिधी)-सरकार सोनापीर बाबा यांच्या उरुसात दि.९ मार्च रोजी कळमनुरीच्या वृद्ध महिलेची पर्स हरवली होती. ज्या पोलिसांना ती सापडली त्यांनी त्या महिलेला शोधून सपोनि शिवप्रकाश मुळे यांचे हस्ते ती परत करून माणुसकीचे दर्शन घडविल्याने पोलिसांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

उरुस निमित्त सोनापीर बाबाच्या दर्शनासाठी हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील जमीलाबी फरीद खान ह्या नात अरबिया शेख शब्बीरसह माहूरला आल्या होत्या. धार्मिक साहित्य खरेदी करीत असतांना आपल्या जवळील पर्स दुकानजवळ ठेवून त्या पुढे निघून गेल्या. परंतु पर्स हरवल्याची आठवण होताच त्यांनी शोधाशोध सुरू केली, परंतु पर्स काही दिसून आली नाही. गावातील सोबतच्या महिलांनी घरी जाण्याची घाई केल्याने त्या कुठेही तक्रार न करताच निघून गेल्या. यात्रा बंदोबस्तासाठी असलेल्या होमगार्ड संजय चव्हाण, ज्योती अंकुडके, अलका तिळेवाड व किशोर जाधव यांना दुकानाच्या बाहेर बेवारस अवस्थेत ती पर्स दिसून आली. सदर बाब सपोनी शिवप्रकाश मुळे यांना कळवून ती पर्स पोलीस ठाण्यात जमा केली.

सपोनी मुळे यांनी पर्स ची तपासणी केली, असता त्यामध्ये २६०० रुपये, पत्ता व फोन नंबर आढळून आल्याने त्यांनी फोनवरून महिलेला तशी कल्पना देऊन पर्स महिलेच्या हवाली केली. पर्स मिळाल्याने महिलेच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. यावेळी सपोनी संगमनाथ परगेवार, पोउपनि आनंद वाठोरे, पालासिंग ब्राह्मण एएसआय नागोराव आत्राम, रामचंद्र दराडे, संदीप गोपनवाड, गजानन चौधरी, बालाजी राठोड, पवन राऊत, गजानन जाधव, सुरेश शिरसाट, संजय चव्हाण, उमेश भगत, एस पी भगत, किशोर जाधव, दिलीप जाधव, शेख गणी शेख इब्राहिम आदींची उपस्थिती होती.

# कळगाव येथील तरुणाच्या खून प्रकरणात एकाला अटक

**उमरी, पुढारी वृत्तसेवा :** तालुक्यातील कळगाव येथील एका तरुणाचा शेतातील आखाड्यावर क्षुल्लक कारणावरून सहा जणांनी गळा चिरून खून केल्याची घटना शनिवारी (दि.९) घडली. उमाकांत गोविंद नंदगाये (२३) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी आरोपींच्या शोधासाठी पोलीसांची तीन पथके रवाना झाली आहेत. दरम्यान, यातील संशयित आरोपी बालाजी यशवंत धतुरे यास आज सकाळी पोलिसांनी अटक केल्याची माहिती आहे .

उमाकांत नंदगाये नेहमीप्रमाणे शुक्रवारी स्वताच्या गावाशेजारील शेती आखाड्यावर झोपण्यासाठी गेला.

दुसऱ्या दिवशी शनिवारी तो सकाळपर्यंत घरी आला नसल्याने त्याचे वडील व काका फोन लागत नसल्याने आखाड्यावर गेले. उमाकांत हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. घटनेची माहिती उमरी ठाण्याचे पोलिस निरीक्षक अंकुश माने हे आपल्या इतर साथीदारांसह घटनास्थळावर पोहचले. घटनास्थळी श्वान पथकाला बोलावण्यात आले होते.

दरम्यान, डूकराला झटका देवून मारण्याची मशीन न विचारता नेल्याचा राग मनात धरून माधव धतुरे, बालाजी धतुरे, राहुल सरोदे, माधव तारू, पुरूषोत्तम सरोदे, यशवंत धतुरे (सर्व रा.कळगाव) उमाकांत नंदगाये याचा धारदार शस्त्राने गळयावर वार करून खुन केला.

याप्रकरणी, मृत उमाकांत यांचा चुलतभाऊ महेश नंदगाये फिर्यादीवरून वरिल सहा जणांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पाच जण फरार असून त्यांच्या शोधासाठी पोलिसांची तीन पथके रवाना झाली आहेत. संशयित आरोपी बालाजी यशवंत धतुरे यास आज सकाळी पोलिसांनी अटक केल्याची पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी सांगितले.

दै. पुढारी